**सोलापूर महानगरपालिका , सोलापूर**

**हुतात्मा स्मृती मंदिर (वातानुकूलित )**

**नाट्यगृह भाड्याने देणे संबंधीच्या शर्ती व अटी**

**मा. शासनाचे आदेशाप्रमाणे ५०% बैठक व्यवस्था व SOP नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. SOP मधील शर्ती व अटी नुसारच कार्यक्रमास परवानगी देणेत येत आहे.**

१) एकूण आसने ७८२ वातानुकूलीत, सेन्सॉरच्या राखीव जागा ए-७ व ए -८, महानगरपालिकेची राखीव जागा एकही नाही. वीज पुरवठा खंडीत झाल्यास जनरेटरची सोय आहे. मात्र त्यावेळी वातानुकुलित व्यवस्था बंद राहील. यासाठी भाड्यामध्ये कसलीही सूट दिली जाणार नाही.

२) नाट्यगृहात जितक्या व्यक्तीची बसण्याची सोय आहे तेवढ्याच व्यक्तींना प्रेक्षक म्हणून प्रवेश दिला जाईल नाट्यगृहात जादा खुर्च्या टाकता येणार नाहीत.

३) हुतात्मा स्मृती मंदिर नाट्यगृहाचा वापर नाट्य प्रयोग,सांस्कृतिक कार्यक्रम व लोकशिक्षण यासाठीच करता येईल. लोक शिक्षण व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये कोणत्या कार्यक्रमाचा समावेश होतो , यासंबंधी मा.महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील.

४) ठरवून दिलेल्या वेळेत प्रयोग संपविण्याची जबाबदारी अजर्दारावर राहील व दिलेल्या वेळांत नाट्यगृह रिकामे करुन दिले पाहिजे , तसे न केल्यास कार्यक्रम बंद करण्याचा अधिकार व्यवस्थापक यांना राहील व ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा अधिक वापरलेल्या प्रत्येक जादा तास किंवा त्याचे भागास रु.२५००/-जादा आकार अर्जदारास द्यावा लागेल. न दिल्यास जादा रकमेची वसुली अनामत रकमेतून करणेत येईल.

५) <u>ऑनलाईन बुकींग करतानाच अनामत (Deposit) म्हणून रोख रुपये १०,००० /- + हॉल भाडे अर्जदारास भरावे लागतील. प्रयोगानंतर अर्जदाराने तसा अर्ज केल्यास अनामत रक्कम त्यास १ महिन्यानी परत मिळू शकेल. परंतु नाट्यगृहाची कुठल्याही प्रकाराची नासधूस होता कामा नये.</u> याबाबत नुकसान भरपाई भरुन घेण्यात येईल.

६) <u>कार्यक्रम झालेनंतर वापरानुसार अन्य वसुलीचा चेक द्यावयाचा झाल्यास “आयुक्त सो.म.न.पा.” यांचे नांवे देणेत यावा. हॉल बुकींग ऑनलाईन करावे लागेल.</u>

७) <u>मागणीदारास त्याचे काही अडचणीमुळे त्याने बुकींग केलेली तारीख रद्द करण्याचा प्रसंग आला तर अनामत रक्कम ही खालीलप्रमाणे परत मिळू शकेल.</u>

<u>प्रयोग दिनांकाचे २ महिने पूर्वी कळविल्यास ९०% भाडे रक्कम परत मिळेल.</u>

<u>प्रयोग दिनांकाचे १ महिने पूर्वी कळविल्यास ८०% भाडे रक्कम परत मिळेल.</u>

प्रयोग दिनांकाचे ७ दिवस अगोदर कळविल्यास ५०% भाडे रक्कम परत मिळेल.

८) हॉल भाडे व्यतिरिक्त प्रत्यक्ष नुकसान , लाईट , LED स्क्रीन , LED लाईट , स्पॉट , लेव्हल्स , जादा वेळ वापर , V.I.P. रुम , A/C रुम इ. भाडे हॉल भाडे व्यतिरिक्त भरावे लागेल अन्यथा अनामत रकमेतून वसुल करणेत येईल.

९) एखाद्या संस्थेस तारीख दिल्यानंतर तारखांची आपसात अदलाबदल करता येणार नाही. तारखांची अदलाबदल करणेबाबतचा अर्ज मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार मा.आयुक्त यांना राहील. याचे कारण देणेत येणार नाही.

१०) एखाद्या अर्जदारास ठरलेल्या दिवशी ठरलेल्या कार्यक्रमासाठी काही कारणामुळे अगर अडचणीमुळे नाट्यगृहाचा वापर करता आला नाही तर त्याने भरलेल्या भाड्याची रक्कम त्यास परत केली जाणार नाही. मात्र शासकीय कारणामुळे दिलेली परवानगी रद्द करावी लागली तर त्यांना प्रयोगासाठी त्यानंतरची तारीख दिली जाईल. अगर त्यांनी तशी इच्छा व्यक्त केल्यास त्यांना भरलेली भाडयाची रक्कम त्यास परत केली जाईल.

११) शनिवार , रविवार व सार्वजनिक सुट्टी या दिवशी प्रयोग असेल तर प्रती प्रयोगास रु. ५००/- जादा आकार पडेल.

१२) सर्व लेबर लॉ , सरकारी नियम यांची जबाबदारी मागणीदारावर राहील.कार्यक्रम सादर करणेपूर्वी नाट्यगृह व्यस्थापकांना पुढील परवाने प्रयोगापूर्वी ८ दिवस अगोदर दाखविले पाहिजेत.

१)अपर जिल्हाधिकारी दंडाधिकारी ,सोलापूर यांची परवानगी

२)कार्यक्रमास करमणूक कर लागू असेल तर संबंधित कर अधिका-यांची लेखी परवानगी

३)तिकीट तिक्री करण्यासाठी अपर जिल्हा दंडाधिकारी यांची परवानगी

४)अपर जिल्हा दंडाधिकारी यांचेकडून मिळालेला परफॉर्मन्स परवाना

५)अपर जिल्हा दंडाधिकारी यांचेकडील लाऊड स्पीकर विषयक परवाना

६) महानगरपालिकेच्या थिएटर टॅक्स भरल्याची पावती व जाहिरात बोर्ड लावणे संबंधीचा

परवाना असे योग्य ते परवाने नसल्यास प्रयोग करु दिला जाणार नाही.याबद्दलची सर्व कमी जास्त जबाबदारी प्रयोगाशी संबंधितांवर राहील.

१३) नाट्यगृह ताब्यात दिल्यापासून ते रिकामे परत देईपर्यंतच्या वेळेत त्याची खराबी अगर नुकसानी होणार नाही याची जबाबदारी अर्जदारावर राहील. जर इमारतीची अगर फर्निचर फिटींग्ज ,पेन्टींग ,विजेची उपकरणे अगर इतर साधनसामुग्री याची काही खराबी अगर नुकसानी झाल्यास त्याबद्दल मा. महागनरपालिका आयुक्त ठरवतील ती नुकसान भरपाई अर्जदारास भरुन द्यावी लागेल. ही वसुली अनामत रकमेतूनही करण्यात येईल.

१४) या नाट्यगृहात होणा-या प्रयोगामुळे इतर कोणाच्या हक्काचा भंग झाला असेल तर त्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

१५) नाट्यगृहाचा उपयोग करण्यासाठी अर्जदारास दिलेली परवानगी रंगमंच , रंगपट , प्रेक्षागृह व यांच्याशी संबंधित मार्ग व परिसर एवढ्या मर्यादीत राहील. इमारतीच्या इतर भागात प्रवेश मिळण्याचा अधिकार या परवानगीने अर्जदारास अगर कार्यक्रमाशी संबंधित असलेल्या अन्य कोणासही प्राप्त होत नाही.

१६) नाट्यगृहात सुसज्ज रंगमंच , रंगपट , ध्वनी व्यवस्था ,प्रकाश व्यवस्था व शीत व्यवस्था आहे. वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर वीज पुरवठा पूर्ववत चालू होण्याच्या कालावधीमधे जनरेटर उपलब्ध करणेकामी किमान ३० लिटर डिझेलची गरज भासते. सदरचे डिझेलपोटीची रक्कम महापालिकेकडे जमा करावी लागेल. या सर्व तरतुदी कार्यक्षम ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे यांत बिघाड निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

१७) नाट्यगृहात थुंकणे , धूम्रपान करणे , घाण करणे बेशिस्त किंवा आक्षेपार्ह वर्तन करणे , नाट्यगृहातील वस्तूची खराबी करणे या गोष्टींना मनाई राहील व या उप्परही अशी नुकसानी केली तर त्याबद्दल भरपाई करण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील. याबाबत मा.आयुक्त ठरवतील तो दंड लागू राहील.

१८) नाट्यगृहातील कार्यक्रमाच्या वेळी रहदारीच्या नियंत्रणासाठी जरुरीप्रमाणे पोलिस मदतीची व्यवस्था अर्जदाराने केली पाहिजे. अशी व्यवस्था अर्जदाराने केलेली नसेल व कोणत्याही कारणास्तव पोलीस मदतीची जरुरी भासल्यास व्यवस्थापक पोलीस मदत मागवतील व त्याचा खर्च अर्जदारास द्यावा लागेल व त्याची वसुली अनामत रकमेतून करणेत येईल.

१९) उपलब्ध असल्यास प्रयोगाच्या नेहमीच्या वेळाव्यतिरिक्त इतर वेळी रंगीत तालमीसाठी नाट्यगृह मिळू शकेल. मात्र यावेळी एयर कंडीशन ची व्यवस्था असणार नाही. प्रत्येक तीन तासाच्या रंगीत तालमीसाठी रु.२५०० /- आकार घेतला जाईल. ही रक्कम अर्जदारास ऑनलाईन आगाऊ भरावी लागेल. रंगीत तालमीच्या वेळी प्रेक्षागारात सदर संस्थेचे पदाधिकारी व संबंधित व्यक्ती शिवाय इतरांस प्रवेश दिला जाणार नाही . ही संख्या दोन्ही मिळून ३५ पेक्षा जास्त नसावी.

२०) नाट्यगृहाचे व्यवस्थापक हे मा. आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली या नाट्यगृहाची व्यवस्था व दैनंदिन कारभार पाहतील.

२१) सदर नियम बदलणे अगर दुरुस्त करणे अगर जादा नियमांची भर घालणे यासाठी नोटीस न देता कारवाई करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना आहे. ते नाट्यगृह वापरणा-या एजन्सीजवर बंधनकारक राहतील.

२२) सदर नियमांच्या अर्थाबदल अगर नाट्यगृहाच्या उपयोगाबद्दल कोणत्याही बाबतीत अर्जदार व व्यवस्थापक यांच्यात मतभेद झाल्यास त्यासंबंधी मा. महापालिका आयुक्त यांचे

आदेश अंतिम राहील व तो दोघांवरही बंधनकारक राहिल. कोणतेही कारण न देता नाट्यगृह नाकारणेचा अधिकार मा. आयुक्त यांना राहिल.

२३) ऑनलाईन हॉल बुकींग , बुकींगच्या दिवसापासून पुढील येणाऱ्या तिसऱ्या दिवसास अनुसरुन ९० दिवसापर्यंत करता येईल.

२४) एकाच सत्राकरिता दोन जणांचे ऑनलाईन बुकींग झाल्यास वेळेनुसार प्रथम बुकींग झालेल्याला प्राधान्य दिले जाईल.

२५) ऑनलाईन बुकींगचे पेमेंटची बँकेशी रुजवात घेऊन खात्री केलेनंतर बुकींग अधिग्राह्य करणेत येईल अन्यथा बुकींग रद्द केले जाईल.

**२६) जो कार्यक्रम करावाचा आहे त्याच कार्यक्रमाचे बुकींग करणेत यावेतफावत आढळल्यास . .दंडात्मक कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी**

२७) सदरचे नियम सोलापूर न्यायकक्षेच्या अधिन राहतील.

आयुक्त

सोलापूर महानगरपालिका सोलापूर